अमरावती महानगरपालिका, अमरावती

जा.क्र. अमनपा/मसंनर/अभि/ 92 /२०२०
दिनांक : १० /०८ /२०२०

प्रति,

गोविंदा प्रॉपर्टीज तर्फे भागीदार
सुभाष नानकराम तलडा व इतर
रा. अमरावती

विषय : मौजा-रहाटगांव, ता.जि.अमरावती येथील स.क्र.५२/२अ, ५३/२भाग, ५६/४, ५६/१,५७/३ ५७/४ ५८ भाग, ५५/५ भाग मधील एकुण क्षेत्र ७.१४ हे.आर. जागेच्या रहिवासी वापराकरीता सुधारीत अभिन्यास नकाशास सिमांकनाकरीता तात्पुरती मंजूरीबाबत.

संदर्भ :- १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./अमनपा/मसंनर/अभि/०६/२०१८ दि.२७/०४/२०१८
२) आपला दि.१३/०५/२०२० रोजीचा सुधारीत प्रस्तावित नकाशे दाखल केलेला अर्ज.
३) या कार्यालयाचे पत्र जा.क्र./अमनपा/मसंनर/अभि/०१/२०२० दि.०१/०७/२०२०
४) आपला दि.१९/१२/२०१७ रोजीचा प्राप्त अर्ज.

विषयांकीत जागेच्या प्रस्तावित अभिन्यास नकाशास संदर्भीत पत्र क्र. १ अन्वये सिमांकनाकरीता तात्पुरती शिफारस करण्यात आली होती. अर्जदाराने संदर्भीत पत्र क्र. २अन्वये सादर केलेल्या सुधारीत प्रस्तावावर संदर्भीत पत्र क्र. ३ अन्वये त्रृटी पत्र दिले आहे. संदर्भीत पत्र क्र. ४ अन्वये सुधारीत अभिन्यास नकाशे सादर केले आहे. सदर प्रस्तावित अभिन्यास नकाशे /रेखांकन नियोजनाच्या माध्यमातुन सर्वसाधारण पणे योग्य आढळून आल्याने/नसल्याने लाल रंगाने आवश्यक त्या सुधारणा दर्शवुन खालील अटींवर सिमांकनाकरीता तात्पुरती सुधारीत मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

१) संदर्भीत पत्र क्र. १ अन्वये प्रस्तावित अभिन्यास नकाशास सिमांकनाकरीता दिलेली शिफारस रद्द समजण्यात यावी.
२) तात्पुरत्या मंजूर अभिन्यास/रेखांकन नकाशा प्रमाणे उपअधिक्षक, भुमि अभिलेख,अमरावती यांचे कडुन प्रत्यक्ष जागेवर आखणी करावी, आखणी करीत असतांना सभोवताल मंजूर अभिन्यासातील रस्त्याशी /नाल्याशी योग्य रित्या समन्वय साधणे आवश्यक राहील. आखणी नंतर काही फरक आढळल्यास जागेवरील आखणी केल्याप्रमाणे उपअधिक्षक, भुमि अभिलेख, अमरावती यांनी प्रमाणित केलेला सिमांकीत मुळ मोजणी नकाशा व त्याआधारे सिमांकित अभिन्यास नकाशे तयार करुन या कार्यालयाकडे सादर करावे लागतील.
३) अभिन्यासाची जागेवर प्रत्यक्ष आखणी करतांना/केल्यानंतर सार्वजनिक उपयोगा करीता राखून ठेवलेल्या खुल्या जागेचे क्षेत्रफळ अभिन्यासाखालील जागेच्या १०% पेक्षा कमी नसावे.
४) मंजुर अभिन्यासातील खुल्या जागेच्या क्षेत्रफळानुसार (Open space) मध्ये नैसर्गिकरित्या उताराच्या बाजुने, आवश्यक त्या क्षेत्राचा शोषखड्डा पावसाचे पाण्याचा निचरा करण्याकरीता, योग्य संरचनेत जमीन पातळीपर्यंत भरणा करुन तयार करणे बंधनकारक राहील.
५) विषयांकित जागेत काही वृक्ष असल्यास आखणीचे वेळी ती नष्ट न करता विद्यमान स्थितीत कायम ठेवावीत. तसेच मंजुर अभिन्यासातील खुल्या जागेत व अंतर्गत रस्त्याच्या कडेला वृक्ष लावून घेण्यात यावे व त्याची ३ वर्षापर्यंत निगा राखणे बंधनकारक राहील.
६) सिमांकित नकाशावर ड्रेनेजचे रेखांकन व छेद नकाशे दर्शविण्यात यावेत.
७) रस्त्याचा छेद नकाशात मंजूरी घेवून त्या नुसार खडीकरणाचे व सी. डी. वर्क इ. कामेपुर्ण करावे.
८) सिमांकित नकाशे १.५०० च्या प्रमाणात असावे.
९) भुखंडाची उपविभागणी महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.
१०) प्राथमिक विकासाची कामे खालील तीन पर्याय पैकी एका पर्यायानुसार करणे आवश्यक आहे.
अ) अभिन्यासातील भूखंडाचे निव्वळ क्षेत्रफळाचे १०% जमिन म.न.पा. कडे खरेदी करुन हस्तांतरीत करुन द्यावी लागेल.

Scanned with CamScanner

ब) प्राथमिक विकासाकरिता येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास शहर अभियंता मनपा, अमरावती यांनी मंजुरी दिल्याप्रमाणे परीगणित होणारे एकणु शुल्क मनपाकडे अर्जदारांना जमा करावे.

क) मा.आयुक्त यांच्या दि.२३/०४/२००४ रोजीच्या आदेशानुसार, प्राथमिक विकासाची कामे स्वखर्चाने करावयाची असल्यास शहर अभियंता, बांधकाम विभाग, म.न.पा.अमरावती कडुन रस्ते,नाली इत्यादी बाबतीत म.न.पा. चे नियमानुसार क्रॉस सेक्शनसह रितसर मंजुरी घेवुनच करावी लागेल.

११) मा. आयुक्त यांच्या दि. १७.१२.२०१५ व दि १/०९/२०१६ रोजीच्या आदेशानुसार खालील बाबींची पुर्तता करणे बंधनकारक राहील.

अ) रस्त्यालगत LED स्ट्रीट लाइट पोल ५०.०० मी. अंतरावर देण्यात यावे.

ब) अभिन्यास नकाशास अंतीम मंजुरी तथा अकृषक आदेश प्राप्त झाल्याशिवाय भुखंडाची विक्री करता येणार नाही.

१२) प्रकरणात अर्जदार जमिनमालक/विकासकर्त्यांनी दाखल केलेल्या मोजणी नकाशात दर्शविलेल्या हद्दी ग्राहय धरुन सिमांकनाची शिफारस करण्यात येत आहे.जागेवरील सिमांकनामुळे जागेच्या लगतच्या जमीन धारकांचे हितसंबध बाधित होत असल्यास व त्याबाबत कोणताही वाद उदभवल्यास व अशा वादामध्ये तथ्य आढळल्यास सदरची तात्पुरती मंजुरीची शिफारस आपोआप रद्द समजण्यात यावी.

१३) सदरहु प्रकरणात अभिन्यास नकाशाना शिफारस करतांना अर्जदार जमीनमालक/विकासकर्त्यांनी प्रकरणासोबत दाखल केलेली महसुल विभागाकडील मालकी हक्कांची ७/१२ उतारे व उपअधिक्षक, भुमी अभिलेख विभागाकडील मोजणी नकाशा इ. ग्राहय धरण्यात आली आहेत. सदर कागदपत्रे बोगस व दिशाभुल करणारे आढळल्यास तसेच अट क्र. १२ मध्ये नमुद केल्यानुसार तथ्य आढळल्यास सदर शिफारस तात्काळ रद्द समजण्यात येईल. त्याचबरोबर भविष्यकाळात या अनुषंगाने कोणतीही तक्रार वा न्यायालयीन वाद उदभवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार जमीनमालक/विकासकर्त्यांची राहील व तशा तक्रारीस वा न्यायालयीन वादास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१४)प्रस्तुत प्रकरणी भुखंडाचे क्षेत्रावर जमिन विकास शुल्क रु.१९,२३,४८२/- भरणा दि.१०/०८/२०२० रोजी करण्यात आलेला आहे.

वरील बाबीचे विकासाकरीता नकाशे, साईज (Size), इत्यादी व आवश्यक तेथे अंदाजपत्रक प्रथम महानगरपालिका कडुन मंजुर करण्यात यावे. व अभिन्यासाचे क्षेत्रफळानुसार प्रति हेक्टरी २५ प्रमाणे झाडे लावून ट्री गार्ड लावावे.

अभिन्यासातील प्राथमिक विकासाची कामे शहर अभियंता, बांधकाम विभाग मनपा,अमरावती यांचे देखरेखीखाली करणे, अनामत रक्कम व सुपरविझन चार्जेसचा भरणा करुन त्यांचे अभिप्रायानुसार, प्रस्तुत सिमांकीत अभिन्यास नकाशाला अंतीम मंजूरी प्रदान करण्यात येईल. सदर विकास कामे केल्याशिवाय कोणत्याही भुखंडावर बांधकाम परवानगी महानगरपालिकातर्फे देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

(मा.आयुक्त यांचे दि.२४/०७/२०२० चे आदेशान्वये)

सहपत्र :-तात्पुरती सुधारीत अभिन्यास मंजुर नकाशाची प्रत

(आशिष ह.उईके)
सहायक संचालक नगररचना
महानगरपालिका, अमरावती.

प्रत माहीती तथा उचित कार्यवाहीस्तव -

१) मा. उपसंचालक, नगर रचना वि.यो.घटक अमरावती
२) उपअधिक्षक, भुमि अभिलेख अमरावती
३) शहर अभियंता, मनपा, अमरावती.
यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करीता.

(आशिष ह. उईके)
सहायक संचालक नगररचना
महानगरपालिका, अमरावती.

Scanned with CamScanner